मित्रांनो! माझ्या विचार करण्याच्या पद्धतीमुळेच मी नास्तिक बनलो आहे. ईश्वरावर विश्वास आणि रोजची देवपूजा व प्रार्थना जिला मी माणसाचे सर्वात स्वार्थी आणि खालच्या दर्जाचे काम मानतो ह्यामुळे मला मदत होईल, का माझी परिस्थिती आणखी बिकट होईल मला माहित नाही. सर्व प्रकारच्या संकटांना धैर्याने तोंड देणाऱ्या नास्तिकांबद्दल मी वाचले आहे, म्हणूनच, अगदी वधस्तंभापर्यंतच्या अंतिम घटकेपर्यंत मी ताठ मानेने उभा राहू इच्छितो.

ज्या दिवशी अशा मानसिकतेचे भरपूर स्त्री-पुरुष आपल्याला आढळतील, की जे मानवजातीची सेवा आणि पीडित मानवाची मुक्ती याखेरीज दुसऱ्या कशाही करता आपले आयुष्य वाहून घेऊ शकणार नाहीत तो दिवस मुक्तीच्या युगाची नांदी ठरेल.

माणसाला फक्त आत्म्याच्या अमरत्वावर विश्वास ठेवायला लावा आणि मग त्यानंतर त्याची सर्व संपत्ती व मालमत्ता खुशाल लुबाडा! अजिबात कुरकुर न करता तो त्यामध्ये तुम्हाला मदत करेल. धर्मोपदेशक आणि सत्ताधारी यांच्या युतीमुळेच तुरुंग, वधस्तंभ, दंडुका आणि हे तत्वज्ञान जन्माला आले आहे.

लोकायत

रु. ५/-

# मी नास्तिक का आहे



शहीद भगतसिंग

# मी नास्तिक का आहे

**प्रथम आवृत्ती:** नोव्हेंबर 2012

**मुद्रक व प्रकाशक:**
अलका जोशी, द्वारा लोकायत, 129 बी/2, एरंडवणे, पुणे - 4

**मुद्रणस्थळ:**
आर. एस. प्रिंटर्स, 455, शनिवार पेठ, पुणे

मूळ निबंध पंजाबी मधील आहे. सदर मराठी अनुवाद, त्याच्या शिव वर्मा यांनी केलेल्या हिंदी अनुवादावरून केला आहे.*'भगतसिंग और उनके साथियों के दस्तावेज', संपादक: जगमोहन सिंह आणि चमनलाल, राजकमल प्रकाशन, १९९१,* या पुस्तकातून हिंदी निबंध घेतला आहे:

---

## लोकायत

### संपर्क पत्ता

**लोकायत, सिंडिकेट बँकेसमोर, लॉ कॉलेज रोड, नळस्टॉपजवळ, पुणे-4**
**(दर रविवारी सायं. 4 ते 7 या वेळेत मीटिंग होते.)**

---

### संपर्क फोन

| | |
|---|---|
| **ऋषिकेश येवलेकर** | 94235 07864 |
| **सुलोचना वरपे** | 98238 50481 |

---

**Website** www.lokayat.org.in
(आमची सर्व पुस्तके वेबसाईटवर मोफत उपलब्ध आहेत)

**Email** lokayat.india@gmail.com

**Mailing List** lokayat.pune@lists.riseup.net

---

**सहयोग मूल्य: रु. 5/-**

# आमच्याबद्दल : लोकायत

आपला देश गंभीर संकटात आहे. खरं तर आपल्याकडे प्रचंड निसर्गसंपदा आहे. साधनसंपत्तीचा पुरेपूर वापर करण्यासाठी लागणारं मनुष्यबळ आपल्या देशात मुबलक आहे. असं असूनही आपण जगातल्या गरिब देशांपैकी एक आहोत.

आता आपले शासनकर्ते स्वत:च्या स्वार्थासाठी देश बहुराष्ट्रीय कंपन्यांना विकत आहेत. या घातक चालीचे भयावह परिणाम समाजात दिसायला सुरुवात झाली आहे. शेती उजाड होत चालली आहे. शेतकरी आत्महत्या करीत आहेत किंवा देशोधडीला लागून शहरांकडे धाव घेत आहेत. अशात वीज, पाणी, टेलीफोन, जीवनावश्यक वस्तूंची महागाई आभाळाला भिडली आहे. तुमचं आमचं जिणं दिवसेंदिवस जिकिरीचं होत चाललं आहे.

या सर्व प्रश्नांवर ठरवलं तर बरंच काही करता येऊ शकतं. गरज आहे ती आपणा सर्वांच्या एकजुटीची. आपण सर्व जण–विद्यार्थी, युवक, श्रमिक, बुध्दिजीवी–एकत्र आलो, एक देशव्यापी संघटन उभं करु शकलो तर देशातील सर्वसामान्य जनतेच्या हिताचा चांगला पर्याय देऊ शकतो. नफेखोरी, स्वार्थी वृत्ती गाडून सर्वांचा सामूहिक विकास साधणारी आणि सर्वांच जीवनमान उंचावणारी विकासनीती राबवू शकतो.

पण मोठं परिवर्तन घडवून आणायचं असेल तर प्रथम प्रचलित समजुतींवर जोरदार हल्ले चढवावे लागतील. वादविवाद, चर्चा घडवून आणाव्या लागतील. जगाकडे शासकांच्या नव्हे तर शोषितांच्या दृष्टीनं पाहावं लागेल. ही पुस्तिका आम्ही याचसाठी प्रकाशित करीत आहोत.

आपणही या विचारांशी सहमत व्हाल. आज आपलंच सरकार देश गहाण टाकून गरिबांच्या जिवावर उठलं असताना आपण असहाय्य होऊन गुपचूप बसणार का? निराशा आणि अंध:कारातून मार्ग तर काढायलाच हवा. आपल्याला एक पाऊल पुढं टाकायलाच हवं.

आम्ही तुमच्यातलेच आहोत. एकत्र येऊन हे काम आम्ही सुरू केलेलं आहे. तुम्हीही आमच्यात सामील व्हा. आपण भेटू, बोलू, संवाद साधू. पुढचं पाऊल एकजुटीनं टाकू आणि बदलाची प्रक्रिया गतिमान करू.

जर तुम्हालाही वाटत असेल की या अन्यायपूर्ण जगाला बदलण्यासाठी सक्रीय व्हायला हवे, तर नक्की संपर्क करा!

# मी नास्तिक का आहे

एक नवीन प्रश्न उभा राहीला आहे – सर्वशक्तिमान, सर्वव्यापी, सर्वज्ञानी परमेश्वराच्या अस्तित्वावर केवळ अहंकारामुळे मी विश्वास ठेवत नाही का? मला ह्या प्रश्नाला तोंड द्यावे लागेल अशी मी कधी कल्पनाही केली नव्हती. माझ्या मित्रांशी गप्पा मारताना माझ्या हे लक्षात आले की माझे काही मित्र – माझा मैत्रीचा दावा चुकीचा नसेल तर – माझ्याबरोबरच्या थोड्याशा संपर्कानंतर ह्या निष्कर्षावर आले की देवाच्या अस्तित्वाला नाकारून मी थोडा जास्तच पुढे जायचा प्रयत्न करतोय, आणि माझ्या अहंकाराने हा अविश्वास (ईश्वरावर) दाखवण्यास एका मर्यादेपर्यंत भाग पाडले आहे. खरोखरच ही समस्या गंभीर आहे. मानवी कमतरतांपासून मी मुक्त असल्याचा दावा करत नाही. मी फक्त एक माणूस आहे, बस्स, ह्यापेक्षा जास्त कुणी नाही. कुणीही ह्यापेक्षा जास्त असल्याचा दावा करू शकत नाही. माझ्यातही एक उणीव आहे. अहंकार हा माझ्या स्वभावाचा एक भाग आहे. माझ्या साथीदारांमध्ये मी ताठर म्हणूनच ओळखला जायचो. इतके की माझे मित्र श्री. बी. के. दत्त सुद्धा कधी कधी मला तसे म्हणायचे. अनेक प्रसंगी माझी हट्टी म्हणून निंदाही झाली आहे. माझ्या काही मित्रांची अशी गंभीर तक्रार आहे की त्यांची इच्छा नसताना अनेक वेळा मी माझी मते त्यांच्यावर लादतो आणि माझे प्रस्ताव मान्य करून घेतो. यात थोडेफार तथ्य आहे, हे मी नाकारत नाही. ह्याला अहंकारही म्हणता येईल. अन्य प्रचलित मतांच्या विरोधात जेव्हा स्वतःच्या मतांचा प्रश्न येतो, तेव्हा निश्चितच मला स्वतःच्या मतांचा अभिमान आहे. पण तो वैयक्तिक नाही. तो स्वतःच्या मताचा न्याय्य अभिमान असू शकतो, त्याला अहंकार म्हणता येणार नाही. गर्व किंवा खऱ्या अर्थाने 'अहंकार' हा स्वतःबद्दलच्या अवाजवी अभिमानाचा अतिरेक असतो. ह्या अवाजवी अभिमानानेच तर मला नास्तिकतेकडे वळवले नाही ना? की ह्या विषयावरील सखोल अभ्यासाने आणि खूप चिंतन केल्यानंतर मी देवावरच्या अविश्वासापर्यंत आलो? ह्या प्रश्नाचीच मी इथे चर्चा करू इच्छितो. पण सर्वप्रथम मला हे स्पष्ट करावेसे वाटते की स्वाभिमान आणि अहंकार या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत.

पहिली गोष्ट ही आहे की वृथाभिमान किंवा अहंकार हा व्यक्तीला देवावर विश्वास ठेवण्याच्या वाटेतील अडथळा कसा काय ठरू शकतो हे मला समजलेले नाही. प्रत्यक्षात माझ्या अंगात गुण नसताना किंवा माझी लायकी नसताना मला यश प्राप्त झाले असेल तरच मी एखाद्या थोर व्यक्तीची थोरवी नाकारू शकतो. इथपर्यंत समजू शकते. पण ज्याचा देवावर विश्वास आहे, अशी व्यक्ती स्वतःच्या अहंकारामुळे त्यावर विश्वास ठेवणे बंद करेल हे कसे शक्य



आहे. दोनच शक्यता आहेत. एक तर माणूस आपल्याला देवाचा प्रतिस्पर्धी समजेल, किंवा तो स्वतःलाच देव मानेल. ह्या दोन्ही परिस्थितींमध्ये तो खरा नास्तिक होऊ शकत नाही. पहिल्या परिस्थितीत तो आपल्या प्रतिस्पर्ध्याचे अस्तित्व नाकारतच नाही. आणि दुसऱ्या परिस्थितीतही तो निसर्गातल्या घडामोडींचे पडद्याआडून नियंत्रण करणाऱ्या शक्तीचे अस्तित्व मान्य करतो. तो स्वतःलाच सर्वश्रेष्ठ शक्ती समजतो की त्याच्या पलीकडे कुणी सर्वश्रेष्ठ शक्ती आहे, हे आपल्या दृष्टीने अजिबात महत्वाचे नाही. मूळ मुद्दा तर हा आहे की त्याचा विश्वास आहे. तो कुठल्याच प्रकारे नास्तिक नाही. तर, मला हे म्हणायचे आहे की, मी ह्यातल्या पहिल्या प्रकारातही मोडत नाही आणि दुसऱ्या प्रकारातही नाही. मी त्या सर्वश्रेष्ठ ईश्वराचे अस्तित्वच मुळी नाकारतो. मी ते का नाकारतो, हे नंतर पाहूया. इथे मला एक गोष्ट स्पष्ट करायची आहे की हा अहंकार नाहीये की ज्यामुळे मी नास्तिक मत बनवायला उद्युक्त झालो. मी स्वतः ती श्रेष्ठ शक्ती नाही की तिचा प्रतिस्पर्धी नाही, की अवतारही नाही. एक गोष्ट निश्चित आहे की मी ह्या विचारांकडे वळण्यास अहंकार कारणीभूत नाही.

हा आरोप खोडून काढण्यासाठी चला, सत्य परिस्थिती काय आहे ते पडताळून पाहू. माझ्या ह्या मित्रांच्या मते दिल्ली बॉम्ब प्रकरण आणि लाहोर कट प्रकरणांमध्ये मला जे अनावश्यक यश मिळाले, कदाचित त्यामुळे माझा अहंकार वाढला. हे बरोबर आहे का हे ही तपासून पाहूया. माझा नास्तिकपणा ही काही अगदी अलीकडची गोष्ट नाहीये. मी जेव्हा कुठलीही प्रसिद्धी नसलेला तरूण होतो व माझे हे वरील मित्र जेव्हा मला ओळखतही नव्हते, तेव्हापासूनच मी ईश्वरावर विश्वास करणे सोडून दिले होते. नास्तिकतेकडे वळवू शकेल असा गैरवाजवी अहंकार किमान एक कॉलेजचा विद्यार्थी तरी बाळगू शकत नाही. काही प्राध्यापकांचा मी आवडता विद्यार्थी होतो, तर अन्य काही जणांचा नावडता. पण मी कधी खूप कष्टाळू किंवा अभ्यासू विद्यार्थी नव्हतो. अहंकाराच्या भावनेत अडकण्याची तर संधीच कधी मिळाली नाही. मी तर लाजाळू, बुजऱ्या वृत्तीचा मुलगा होतो, ज्याच्यात भविष्याबद्दल थोडी निराशावादी प्रवृत्ती होती. आणि त्या काळात मी पूर्णपणे नास्तिक नव्हतो. ज्यांच्या प्रभावाखाली मी वाढलो ते माझे वडील सनातनी आर्यसमाजी होते. एक आर्यसमाजी बाकी काहीही असो पण नास्तिक नसतो. माझे प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर मी लाहोरच्या डी.ए.व्ही शाळेत प्रवेश घेतला आणि त्यानंतर एक पूर्ण वर्ष त्यांच्या वसतीगृहात राहीलो. तिथे सकाळ-संध्याकाळच्या प्रार्थनेव्यतिरिक्त मी तासन्तास गायत्रीमंत्राचे पठण करत असे. त्याकाळात मी पूर्णपणे भाविक होतो. नंतर मी माझ्या वडिलांबरोबर राहायला सुरुवात केली. सनातनी धार्मिक मतांबाबतीत ते उदारमतवादी आहेत. स्वातंत्र्यासाठी आयुष्य वेचण्याची प्रेरणा मला त्यांच्याच शिकवणीतून मिळाली. पण ते नास्तिक नाहीत. त्यांचा ईश्वरावर दृढविश्वास आहे. मला रोज प्रार्थना

म्हणण्यास ते प्रोत्साहित करत असत. अशाप्रकारे माझे पालनपोषण झाले. असहकार चळवळीच्या वेळी मी नॅशनल कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. इथे आल्यानंतरच मी सर्व धार्मिक समस्यांवर चर्चा करणे उदा. देवाच्या बाबतीत उदारमतवादी विचार करणे, त्यावर टीका करणे वगैरे गोष्टीना सुरुवात केली. पण अजूनही मी पक्का आस्तिक होतो. जरी शीख किंवा अन्य धर्मातील पौराणिक गोष्टीं आणि मतांवर माझा विश्वास बसला नव्हता, तरी त्यावेळपर्यंत मी केस न कापता ते लांबच ठेवत होतो. पण देवाच्या अस्तित्वावर माझा पक्का विश्वास होता.

पुढे मी क्रांतिकारी पक्षाशी जोडला गेलो. तिथे गेल्यावर सगळ्यात पहिल्यांदा ज्या नेत्याच्या संपर्कात आलो, त्यांचा देवावर अजिबात विश्वास नसूनसुद्धा देव नाकारण्याची त्यांची हिंमत नव्हती. देवाविषयी मी जिद्दीने प्रश्न विचारत राहील्यानंतर ते म्हणायचे, "जेव्हा इच्छा होईल तेव्हा पूजा करत जा." ही नास्तिकताच आहे पण ती स्वीकारण्याचे धाडस नाहीये. दुसरे नेता ज्यांच्या संपर्कात मी आलो ते पक्के श्रद्धाळू होते. त्यांचे नाव आहे आदरणीय कॉम्रेड सचींद्रनाथ सान्याल. सध्या ते काकोरी कट प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा भोगत आहेत. 'बंदी जीवन' (तुरुंगातील जीवन) ह्या त्यांच्या सुप्रसिद्ध व एकमेव पुस्तकात पहिल्या पानापासूनच ईश्वराचे गुणगान केले आहे. या सुंदर पुस्तकाच्या दुसऱ्या भागात शेवटच्या पानावर वेदान्ताच्या कारणामुळे ईश्वराची प्रशंसा करताना त्यांनी केलेला स्तुतिसुमनांचा वर्षाव हा त्यांच्या अजब विचारांचा भाग आहे. २८ जानेवारी, १९२५ ला भारतभर वाटले गेलेले 'दी रिव्होल्यूशनरी' (क्रांतिकारी) हे पत्रकसुद्धा त्यांच्याच विचाराचा परिणाम आहे, असा सरकारी पक्षाचा दावा आहे. अशा प्रकारच्या गुप्त कामांमध्ये कोणताही प्रमुख नेता निःसंशयपणे स्वतःला पसंत असलेले आपलेच विचार मांडतो. बाकी कार्यकर्त्यांना त्याविषयी मतभेद असले तरी आपली सहमती दाखवावी लागते. त्या पत्रकामध्ये एक संपूर्ण परिच्छेद सर्वशक्तिमान देवाची कार्ये आणि लीला ह्याने भरलेला होता. हा सर्व गूढवाद आहे. मला जे म्हणायचे आहे ते हे की ईश्वरावरचा अविश्वास ही कल्पना क्रांतिकारी पक्षात सुद्धा रुजलेली नव्हती. काकोरीच्या प्रसिद्ध चारही शहीदांनी आपले शेवटचे दिवस भजन-प्रार्थना ह्यामध्ये घालवले होते. रामप्रसाद बिस्मिल एक सनातनी आर्यसमाजी होते. समाजवाद आणि साम्यवादाच्या क्षेत्रात खूप अभ्यास असूनही राजन लाहिरी हे उपनिषदे व गीतेतील श्लोक पठण करण्याची आपली इच्छा आवरू शकले नाहीत. मी त्यांच्यातील एकच व्यक्ती पाहिली जिने कधीच प्रार्थना केली नाही आणि ते म्हणत असत, "तत्वज्ञान माणसातील दुबळेपणा किंवा त्याच्या ज्ञानाची मर्यादा ह्यांची निष्पत्ती आहे." ते ही आज आजन्म कारावासाची शिक्षा भोगत आहेत. पण त्यांनीही कधी देवाच्या अस्तित्वाला नाकारण्याची हिंमत दाखवली



नाही.

ह्यावेळपर्यंत मी एक आदर्श स्वप्नाळू क्रांतिकारक होतो. आत्तापर्यंत आम्ही दुसऱ्यांचे अनुकरण करत होतो. पण आता सर्व जबाबदारी स्वतः पेलण्याची वेळ आली होती. काही काळ तर, अपरिहार्य प्रतिक्रियांमुळे पक्षाचे अस्तित्वच अशक्य वाटू लागले होते. उत्साही साथीदारांनी – नव्हे नेत्यांनी – आमची खिल्ली उडवायला सुरुवात केली. आपल्या कार्यक्रमामध्ये काही अर्थ नाही ह्यावर एक दिवस माझी स्वतःची खात्री पटते की काय अशी भीती मला काही काळाकरता वाटायला लागली. तो माझ्या क्रांतिकारी आयुष्यातला निर्णायक क्षण होता. 'अभ्यासा'ची हाक माझ्या मनांत कानाकोपऱ्यात घुमू लागली होती: विरोधकांनी केलेल्या युक्तिवादाचा सामना करण्यासाठी अभ्यास कर; आपल्या मतांच्या समर्थनार्थ युक्तिवाद करण्यासाठी अभ्यास कर. मी अभ्यासाला सुरुवात केली. यामुळे माझ्या जुन्या विचारांमध्ये आणि विश्वासामध्ये आश्चर्यकारकपणे सुधारणा झाली. आमच्या पहिल्या साथीदारांमध्ये असलेली हिंसात्मक कृती करण्याच्या आकर्षणाची जागा आता गंभीर विचारांनी घेतली. आता गूढवाद आणि अंधश्रद्धांना अजिबात जागा राहीली नाही. वास्तववाद आमचा पाया बनला. अत्यंत कठीण प्रसंगी गरज असेल तरच हिंसेचा आधार घेणे उचित ठरेल. अहिंसा हे सर्व लोकचळवळींचे अपरिहार्य तत्व असायला हवे. हे झाले कार्यपद्धतींविषयी. पण सगळ्यात महत्वाचे हे की ज्या आदर्शांसाठी लढायचे त्याची स्पष्ट कल्पना हवी. त्यावेळी खास असे क्रांतिकारी काम होत नव्हते, त्यामुळे मला जगभरातल्या इतर क्रांत्यांच्या आदर्शांचा अभ्यास करण्याची चांगली संधी मिळाली. अराजकतावादी नेता बाकुनिनचा मी अभ्यास केला, साम्यवादाचे जनक मार्क्स थोडेफार वाचले, पण स्वतःच्या देशात यशस्वीपूर्ण क्रांती घडवून आणणारे लेनिन, ट्रॉट्स्की व इतरांच्या बद्दल बरेच वाचले. ते सर्व नास्तिक होते. बाकुनिनचे 'ईश्वर आणि शासन' हे पुस्तक ह्या विषयावरचा मर्यादित पण चांगला अभ्यास आहे. नंतर मला निरलंब स्वामींचे 'सहज ज्ञान' (कॉमन सेन्स) हे पुस्तक मिळाले. ह्यात फक्त गूढ नास्तिकता होती. ह्या विषयाकडे माझा ओढा वाढला. १९२६ सालच्या शेवटापर्यंत हे विश्व निर्माण करणाऱ्या, चालवणाऱ्या व त्याचे नियंत्रण करणाऱ्या अशा सर्वश्रेष्ठ परमेश्वराचे अस्तित्व ही उघड उघड बकवास आहे असे मी मानू लागलो होतो. मी माझा अविश्वास प्रदर्शित केला. ह्या विषयावर माझ्या मित्रांबरोबर वाद घालायला सुरुवात केली. मी जाहीरपणे एक नास्तिक म्हणून ओळखला जाऊ लागलो. पण ह्याचा अर्थ काय हे मी पुढे सांगेन.

मे, १९२७ ला मला लाहोर येथे अटक झाली. ही अचानक झालेली अटक होती. पोलीस माझा शोध घेत आहेत याबद्दल मला जराही कल्पना नव्हती. एका बागेतून जात असताना अचानकपणे पोलिसांनी मला घेरल्याचे माझ्या लक्षात

आले. त्याप्रसंगी मी अत्यंत शांत होतो याचे मला स्वत:लाच आश्चर्य वाटले. कसलीही संवेदना किंवा चलबिचल मला जाणवली नाही. मला पोलिसांनी ताब्यात घेतले. दुसऱ्या दिवशी मला रेल्वेच्या पोलीस कोठडीत नेण्यात आले. इथे मला एक महिना काढायला लागला. बरेच दिवस पोलीस अधिकाऱ्यांशी झालेल्या बोलण्यावरून मला असे वाटले की त्यांना माझा काकोरी दलाशी असलेला संबंध आणि माझ्या क्रांतिकारी आंदोलनासंबंधी कार्यांची काही माहिती होती. त्यांनी मला सांगितले की: जेव्हा खटला (काकोरी कट) चालू होता तेव्हा मी लखनौला होतो; त्यांच्या सुटकेसाठी आम्ही एक योजनेवर चर्चा केली होती; त्यांची संमती मिळाल्यावर आम्ही काही बॉम्ब मिळवले होते; आणि १९२६ ला चाचणी घेण्यासाठी त्यातला एक बॉम्ब आम्ही दसऱ्याला जमलेल्या गर्दीत फेकला. त्यानंतर माझ्या भल्यासाठी त्यांनी मला सांगितले की जर मी क्रांतिकारी पक्षाच्या कार्यक्रमावर प्रकाश टाकणारे एक निवेदन दिले, तर मला अटक केली जाणार नाही, उलट मला न्यायालयात खबऱ्या म्हणून उभे न करता सोडून दिले जाईल व त्याशिवाय इनामही दिले जाईल. त्यांच्या ह्या प्रस्तावावर मला हसायला आले. त्या सगळ्याला काही अर्थ नव्हता. आमच्यासारखा विचार करणारे, निष्पाप लोकांवर बॉम्ब फेकत नाहीत. एके दिवशी सकाळी गुप्तचर खात्याचे वरिष्ठ अधिकारी श्री. न्यूमन माझ्याकडे आले. बराच वेळ सहानुभूतिपूर्वक बोलल्यानंतर त्यांनी मला, त्यांच्या दृष्टीने, एक अत्यंत दु:खद बातमी दिली. ते म्हणाले, त्यांनी मागितल्याप्रमाणे मी निवेदन दिले नाही, तर काकोरी कटासंबंधी विद्रोह केल्याबद्दल व दसरा बॉम्बस्फोटात निघृण हत्यांबद्दल माझ्यावर खटला भरणे त्यांना भाग पडेल. त्यांनी मला असेही सांगितले की मला शिक्षा देण्यासाठी (फाशीची) त्यांच्याकडे पुरेसे पुरावे उपलब्ध आहेत. मी जरी पूर्णपणे निरपराध होतो, तरी पोलीस त्यांना हवे ते करू शकतात ह्याबद्दल माझी खात्री होती. त्याच दिवसापासून काही पोलीस अधिकारी मी दोन वेळा देवाची प्रार्थना करावी म्हणून माझे मन वळवू लागले. पण आता मी एक नास्तिक होतो. मला माझी स्वत:ची कसोटी घ्यायची होती की फक्त शांत आणि आनंदी दिवसांमध्येच मी नास्तिक असल्याची बढाई मारतो की अशा कठीण प्रसंगीसुद्धा मी माझ्या तत्त्वांना चिकटून राहू शकतो. बऱ्याच विचारांती मी हा निर्णय घेतला की कुठल्याही प्रकारे मी देवावर विश्वास ठेऊ शकत नाही किंवा देवाची प्रार्थना करू शकत नाही. एक क्षणही मी प्रार्थना केली नाही. हीच खरी कसोटीची वेळ होती आणि त्यात मी यशस्वी झालो. थोड्या वेळाकरताही काही गोष्टींच्या बदल्यात स्वत:ची मान वाचवायची इच्छा मी केली नाही. आता मी एक पक्का नास्तिक होतो आणि आजपर्यंत आहे. त्या कसोटीला उतरणे ही काही सोपी गोष्ट नव्हती.

'विश्वास' कष्टांची तीव्रता कमी करतो, एवढेच नाही तर सुखावहसुद्धा करतो. देव माणसाला सांत्वना देणारा एक आधार बनू शकतो. 'त्याच्या'शिवाय



माणसाला स्वत:वरच अवलंबून राहावे लागते. तुफानात आणि वादळात स्वत:च्या पायावर उभे राहणे हा काही पोरखेळ नाही. अशा कसोटीच्या क्षणी जर अहंकार असलाच तर पार वितळून जातो आणि माणूस सर्वसाधारण श्रद्धांना ठोकरण्याचे धाडस करू शकत नाही. आणि जर केलेच, तर त्यातून हाच निष्कर्ष निघतो की त्याच्याजवळ फक्त अहंकार नाही तर दुसरी कुठलीतरी शक्ती आहे. आज अगदी अशीच परिस्थिती आहे. खटल्याचा निकाल काय लागणार हे आधीच माहीत आहे. एका आठवड्यात निर्णय दिला जाईल. मी माझे आयुष्य एका ध्येयासाठी अर्पण करत आहे ह्या विचारां खेरीज आणखी कोणते सांत्वन माझ्याकरता असू शकते? देवावर विश्वास ठेवणारा हिंदू पुढचा जन्म राजाचा असावा अशी अपेक्षा करू शकतो, एक मुसलमान किंवा ख्रिश्चन आपल्या कष्टांचे आणि त्यागाचे बक्षीस म्हणून स्वर्गात समृद्धी आणि आनंद मिळेल ह्याची स्वप्ने पाहतो. पण मी कशाची अपेक्षा करावी? मला माहीत आहे की ज्या क्षणी फाशीचा फास माझ्या गळ्याभोवती आवळला जाईल आणि माझ्या पायाखालची फळी काढली जाईल, तोच पूर्णविराम असेल – तोच अंतिम क्षण असेल. मी किंवा अध्यात्मिक भाषेत सांगायचे तर, माझ्या आत्म्याचा तिथेच शेवट होईल. बस्स इतकेच. पुढे काही राहणार नाही. ज्यात खूप काही गौरवशाली यश मिळालेले नाही असे एक छोटेसे संघर्षमय जीवन, हे स्वत:च एक बक्षीस असेल – अर्थात तसे मानायचे धैर्य माझ्यात असेल तर. हेच सर्वकाही आहे. निस्वार्थी, इहलोकी व परलोकी फळाची अपेक्षा न ठेवता, अगदी निरिच्छपणे मी माझे आयुष्य स्वातंत्र्याच्या ध्येयासाठी समर्पित केले आहे, कारण ह्यापेक्षा वेगळे काही करणे मला जमलेच नसते. ज्या दिवशी अशा मानसिकतेचे भरपूर स्त्री-पुरुष आपल्याला आढळतील, की जे मानवजातीची सेवा आणि पीडित मानवाची मुक्ती याखेरीज दुसऱ्या कशाही करता आपले आयुष्य वाहून घेऊ शकणार नाहीत तो दिवस मुक्तीच्या युगाची नांदी ठरेल. ते शोषकांना, जुलमी सत्ताधीशांना, पिळवणूक करणाऱ्यांना आव्हान देण्यासाठी उत्साहित होतील. हे सगळे, ते या जन्मी पुरस्कार मिळवण्यासाठी, पुढच्या जन्मी राजा होण्यासाठी किंवा स्वर्गात जागा मिळण्याची अपेक्षा ठेवून नव्हे, तर मानवजातीच्या मुक्तीसाठी करतील. मानवजातीच्या मानेवरील गुलामीचे जोखड उलथून टाकण्यासाठी, स्वातंत्र आणि शांतता प्रस्थापित करण्यासाठी त्यांना हा मार्ग अंगिकारावा लागेल. त्यांच्या स्वत:साठी धोकादायक असलेल्या पण त्यांच्या महान आत्म्यासाठी असलेल्या एकमेव उत्कृष्ट मार्गाने जायला ते तयार होतील का? त्यांच्या उदात्त ध्येयाबद्दल त्यांना असलेल्या अभिमानाला अहंकार म्हणून त्याचा चुकीचा अर्थ तर लावला जाणार नाही? अशी घृणित विशेषणे लावण्याचे धाडस कोण करेल? मी तर म्हणतो अशी व्यक्ती एकतर मूर्ख असेल किंवा धूर्त तरी. पण त्याला आपण क्षमा करूया कारण त्याला त्यांच्या मनातील उच्च विचार, भावना, आवेग यांची तीव्रता

जाणवू शकत नाहीत. त्याचे हृदय मांसाच्या गोळ्यागत मृत आहे. अनेक हितसंबंधांचे झापड असल्यामुळे त्याची दृष्टी अधू झाली आहे. स्वत:वर ठाम विश्वास असणे या गुणाला अहंकार म्हटले जाते, हे खूप दु:खदायक आहे पण त्याला इलाज नाही.

तुम्ही जा, आणि एखाद्या प्रचलित धर्माला विरोध करा; जा आणि एखाद्या हीरो किंवा महान व्यक्तीची – जिच्याबद्दल साधारणपणे असा विश्वास व्यक्त केला जातो की ती टीकेच्या पलीकडे आहे कारण ती चुका करू शकत नाही – टीका करा, तर तुमच्या युक्तिवादाची ताकद हजारो लोकांना तुम्ही अहंकारी असल्याचा आक्षेप घ्यायला विवश करेल. हे मनाच्या ताठरपणामुळे होते. टीका आणि स्वतंत्र विचार, हे दोन्ही एका क्रांतिकारकासाठी अनिवार्य गुण आहेत. महात्माजी थोर आहेत, म्हणून कोणी त्यांची टीका करता कामा नये; ते उच्चस्थानावर आहेत, म्हणून त्यांनी सांगितलेली प्रत्येक गोष्ट – मग ती राजकारणा विषयी असो किंवा धर्म, अर्थशास्त्र किंवा नीतीशास्त्रा विषयी – बरोबरच आहे. तुम्हाला पटत असो वा नसो तुम्ही म्हटलेच पाहिजे की “हो, हेच बरोबर आहे.” ही मानसिकता विकास घडवून आणू शकत नाही, ती स्पष्टपणे प्रतिगामी आहे.

आमच्या पूर्वजांनी सर्वशक्तिमान परमेश्वराबद्दल विश्वास निर्माण केला होता, त्यामुळे जो कोणी ह्या विश्वासाच्या खरेपणाला आव्हान देईल किंवा त्या सर्वश्रेष्ठ परमेश्वराच्या अस्तित्वाबद्दल शंका घेईल, तो धर्मभ्रष्ट व विश्वासघातकी गणला जाईल. जर त्याचा युक्तिवाद इतका भक्कम असेल, की प्रतिवाद करून खोडून काढता येणार नाही आणि त्याची श्रद्धा इतकी ठाम असेल की ईश्वरी कोपाने त्याच्यावर संकट कोसळण्याची भीती दाखवली तरी डळमळणार नाही – तर त्याची घमेंडखोर म्हणून आणि त्याचा स्वभाव अहंकारी आहे म्हणून निंदा केली जाईल. त्यामुळे ह्या निरर्थक वादात वेळ का दवडायचा? मग ह्या सगळ्या गोष्टींवर वाद घालण्याचा प्रयत्न तरी का करायचा? हा दीर्घ वाद अशासाठी, कारण सर्वसामान्य जनतेसमोर हा प्रश्न पहिल्यांदाच उपस्थित झाला आहे, आणि आज प्रथमच ह्यावर वस्तुनिष्ठपणे चर्चा होत आहे.

पहिल्या प्रश्नाचा विचार करता, मला वाटते की, अहंकारामुळे मी नास्तिकतेकडे वळलो नाही हे मी स्पष्ट केले आहे. माझ्या युक्तिवादाची पद्धत योग्य आहे की नाही हे वाचकांनी ठरवायचे आहे, मी नाही. मला माहित आहे की सध्याच्या परिस्थितीत देवावरील विश्वासाने माझे आयुष्य सोपे झाले असते आणि माझ्या मनावरचा भार कमी झाला असता. देवावरच्या माझ्या अविश्वासाने वातावरण अत्यंत नीरस बनवले आहे आणि परिस्थिती एक बिकट रूप धारण करू शकते. थोडासा गूढवाद तिला (परिस्थितीला) काव्यमय बनवू शकतो. पण माझ्या नशीबाला सामोरे जाताना मला अशा संभ्रमाची आवश्यकता नाही. मी



वास्तववादी आहे. विवेकाच्या जोरावर मला माझ्या अंतस्थ स्वभावावर मात करायची आहे. ह्या ध्येयात मला नेहमीच यश मिळाले आहे असे नाही. पण प्रयत्न करत राहणे हे माणसाचे कर्तव्य आहे. यश संधीवर आणि वातावरणावर अवलंबून असते.

दुसरा प्रश्न हा आहे की जर हा अहंकार नव्हता, तर मग ईश्वराच्या अस्तित्वाबद्दल पूर्वापार चालत आलेल्या आणि आजही प्रचलित असलेल्या श्रद्धा नाकारायला काहीतरी कारण असायला हवे. आता मी याच गोष्टीकडे वळतो आहे. होय, कारण आहे. विवेकबुद्धी असलेला कोणीही माणूस आपल्या सभोवतालच्या परिस्थितीला तर्कदृष्ट्या समजून घेऊ इच्छितो. जिथे सरळ पुरावे नसतात तिथे तत्वज्ञान महत्वपूर्ण भूमिका बजावते. मी आधी म्हटल्याप्रमाणे माझे काही क्रांतिकारी साथी म्हणायचे की तत्वज्ञान माणसाच्या दुबळेपणाचे लक्षण आहे. आपल्या पूर्वजांनी जेव्हा रिकाम्या वेळात या जगाचे रहस्य – त्याचा भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ, त्याचे ‘का’ आणि ‘कसे’ – हे समजून घेण्याचा प्रयत्न केला तेव्हा सरळ पुराव्यांच्या अभावी प्रत्येकाने हे प्रश्न आपापल्या पद्धतीने सोडवले. निरनिराळ्या धर्मांतील मूलभूत तत्वांमध्ये जो फरक दिसतो त्याचे कारण हेच आहे. कधी कधी हा फरक शत्रुत्व किंवा संघर्षाचे रूप धारण करतो. पूर्वेकडील आणि पाश्चिमात्य तत्वज्ञानात तर फरक आहेच, पण प्रत्येक भू-गोलार्धातल्या मतप्रणालींमध्येही फरक आहे. आशियातल्या हिंदू धर्मात आणि मुस्लिम धर्मात कुठलाही सारखेपणा नाही. भारतातसुद्धा बुद्ध आणि जैन धर्म हे ब्राह्मणवादाहून खूप वेगळे आहेत. पुन्हा ब्राह्मणवादातही आर्यसमाज आणि सनातन धर्म अशी परस्परविरोधी मते आहेत. चार्वाक हा प्राचीन काळातील आणखी एक स्वतंत्र तत्वज्ञ होता. त्या काळातच त्याने ईश्वराच्या अस्तित्वाला आव्हान दिले होते. ही सगळी मते मूलभूत प्रश्नाबाबत एकमेकांपासून भिन्न आहेत आणि प्रत्येकाला वाटते की आपलेच बरोबर आहे. हेच तर दुर्दैव आहे. आम्ही जुन्याकाळातील ज्ञानी व विचारवंतांचे अनुभव आणि विचारांना भविष्यातील अज्ञानाच्या विरोधातील लढाईचा आधार बनवून हा गहन प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करत नाही. याऐवजी आम्ही आळशासारखे – ते तर आम्ही सिद्ध झालोय – त्यांच्या सांगण्यावर नि:संशय विश्वास ठेवून त्या विश्वासाचेच स्तोम माजवत आहोत. आणि अशा तऱ्हेने मानवी विकासात अडथळा आणण्याचा गुन्हा करत आहोत.

विकासासाठी सज्ज असलेल्या प्रत्येकाला, रूढीवादी विश्वासाच्या प्रत्येक बाजूवर टीका तसेच त्यावर अविश्वास व्यक्त करावा लागेल आणि त्याला आव्हान द्यायला लागेल. प्रत्येक प्रचलित मताच्या प्रत्येक गोष्टींला प्रत्येक बाजूंने विवेकाच्या कसोटीवर घासून घ्यायला लागेल. खूप तर्कशुद्ध विचार करून जर कुणी कुठल्या तत्वज्ञानाकडे आकर्षित झाला, तर त्याच्या विश्वासाचे स्वागत

करू. त्याचा तर्क चुकीचा, भ्रामक आणि कधी कधी खोटाही असू शकतो. विवेक हा त्याच्या जीवनाचा मार्गदर्शक असल्यामुळे त्याच्या विचारांमध्ये सुधारणा होऊ शकते. पण घट्ट विश्वास आणि अंधश्रद्धा धोकादायक आहेत. त्या माणसाला मूर्ख आणि प्रतिगामी बनवतात. जो माणूस स्वत: वास्तववादी असल्याचा दावा करतो, त्याला सर्व प्राचीन विश्वासांना आव्हान द्यावे लागेल. जर ते तर्कशुद्ध विचारांचा हल्ला सहन करू शकले नाहीत, तर कोसळून पडतील. अशा वेळी त्या व्यक्तीचे पहिले काम हे की तमाम जुन्या विश्वासांचा संपूर्ण नि:पात करून नवीन तत्वज्ञानाच्या उभारणीसाठी जागा स्वच्छ करायची. ही नकारात्मक बाजू झाली. ह्यानंतर खरे काम सुरू होते ज्यामध्ये पुनर्बांधणीसाठी जुन्या मतांमधल्या काही गोष्टींचा वापर केला जाऊ शकतो. माझ्यापुरते म्हणाल तर मी हे आधीच मान्य करतो की मी ह्याविषयावर फार अभ्यास करू शकलेलो नाही. आशियाई तत्वज्ञानाचा अभ्यास करण्याची माझी खूप इच्छा होती पण मला तशी संधी मिळाली नाही. पण ह्या वादाच्या नकारात्मक बाजूचा विचार केला तर प्राचीन श्रद्धांच्या ठामपणाविषयी प्रश्न उत्पन्न करण्याइतपत तरी माझी खात्री झाली आहे. निसर्गातील घडामोडींचे संचालन व नियंत्रण करणारी कोणतीही सर्वश्रेष्ठ शक्ती अस्तित्वात नाही याबद्दल माझी पक्की खात्री आहे. आमचा निसर्गावर विश्वास आहे. प्रगतीचे ध्येय माणसाने आपल्या सेवेसाठी निसर्गावर विजय मिळवणे हे आहे. याला दिशा देण्यामागे परमात्मा नाही. हेच आमचे तत्वज्ञान आहे.

नकारात्मक बाजूबद्दल बोलायचे तर आम्ही आस्तिक लोकांना काही प्रश्न विचारू इच्छितो –

तुमच्या श्रद्धेनुसार जर ही पृथ्वी किंवा हे विश्व त्या सर्वव्यापी, सर्वशक्तीमान अशा परमेश्वराने निर्माण केले आहे तर त्याने मुळात हे सर्व का निर्माण केले हे कृपया मला सांगाल काय? दु:ख आणि संकटांनी भरलेले हे जग – असंख्य दु:खांच्या निरंतर आणि अनंत युतिने ग्रासलेले! एकही प्राणीमात्र सर्वार्थाने सुखी नाही.

कृपा करून हाच त्या जगनियंत्याचा नियम आहे असे सांगू नका. तो जर कुठल्या नियमांनी बांधलेला असेल तर तो सर्वशक्तिमान नाही. मग तो आपल्यासारखाच गुलाम आहे. कृपा करून ही त्याची आनंदक्रीडा आहे असेही म्हणू नका. नीरोने तर एक रोम जाळून खाक केले. त्याने फक्त काही लोकांची हत्या केली होती. त्याने फारच थोडे दु:ख निर्माण केले, निव्वळ आपल्या आनंदासाठी आणि मनोरंजनासाठी. आणि इतिहासात त्याचे काय स्थान आहे? इतिहासकार त्याचा कोणत्या नावाने उल्लेख करतात? सगळ्या कडवट विशेषणांचा त्याच्यावर वर्षाव होत असतो. नीरोचा निषेध करण्यासाठी जुलमी, निर्दयी, सैतान सारख्या शब्दांनी पानेच्या पाने भरली आहेत. एका चंगेजखानने



स्वत:च्या सुखासाठी हजारोंचे प्राण घेतले आणि आज आपल्याला त्याच्या नावाचा तिरस्कार आहे. तर मग दररोज, दर तासाला नव्हे दर मिनिटाला असंख्य दु:ख देणाऱ्या आणि अजूनही देत असलेल्या सर्वशक्तिमान, अनादिअनंत नीरोचे कसे काय समर्थन करता? प्रत्येक क्षणाला चंगेजखानच्या दुष्कृत्यांनाही मागे टाकणाऱ्या त्याच्या दुष्कृत्यांचा कसा स्वीकार करता? मी विचारतो की खरोखरच नरक असलेल्या, अनंत आणि खोलवर वेदना देणाऱ्या या जगाला त्याने निर्माणच का केले? त्या सर्वश्रेष्ठ परमेश्वराजवळ मनुष्य निर्माण न करण्याची ताकद होती तर मग त्याने माणसाची उत्पत्ती का केली? ह्या सर्व प्रश्नांची तुमच्याकडे काय उत्तरे आहेत? तुम्ही हेच म्हणाल की कष्ट सहन करणाऱ्या निर्दोष लोकांना पुढच्या जन्मी चांगले बक्षीस देण्यासाठी आणि चुका करणाऱ्यांना शिक्षा देण्यासाठी हे घडत आहे. ठीक आहे. ठीक आहे. भविष्यात तुमच्या शरीरावर नाजूकपणे आणि आरामदायक मलमपट्टी करता यावी म्हणून आज आपल्याला जखमी करण्याचे धाडस करणाऱ्या त्या व्यक्तीचे तुम्ही अजून किती काळ समर्थन करणार आहात? एका भुकेलेल्या सिंहासमोर माणसाला फेकून द्यायचे आणि जर त्या माणसाने त्या जंगली जनावरापासून आपला बचाव करून स्वत:ला वाचवले तर नंतर त्याची अगदी बडदास्त ठेवायची, हे काम करणाऱ्या ग्लॅडिएटर संस्थेच्या व्यवस्थापकांचे काम कितपत योग्य होते? म्हणूनच मी विचारतो, "त्या सर्वश्रेष्ठ परमेश्वराने ह्या विश्वाची आणि त्यात माणसाची निर्मिती का केली? स्वत:च्या मनोरंजनासाठी? तर मग त्याच्यात आणि नीरोमध्ये काय फरक आहे?"

मुसलमान आणि ख्रिस्ती बांधवांनो! हिंदू तत्वज्ञानामध्ये आणखी काही युक्तिवाद असू शकतात. मी तुम्हाला असे विचारतो की वरील प्रश्नांची तुमच्याकडे काय उत्तरे आहेत? तुमचा तर पुनर्जन्मावर विश्वास नाही. त्यामुळे तुम्ही हिंदूंसारखा हा युक्तिवाद देऊ शकत नाही की पूर्वजन्मीच्या पापाचे फळ म्हणून निष्पाप व्यक्तींना यातना भोगाव्या लागतात. मी तुम्हाला असे विचारतो की त्या सर्वशक्तिशाली परमेश्वराने विश्वाच्या निर्मितीसाठी सहा दिवस मेहनत का केली आणि वर असे का म्हणाला होता की सर्व काही ठीक आहे. त्या विधात्याला आजच बोलवा, आणि मागील इतिहास त्याला दाखवा. त्याला सद्य परिस्थितीविषयी अभ्यास करू दे आणि मग आपण पाहू की सर्व काही ठीक आहे असे म्हणायचे धाडस आजही त्याला होते का?

तुरुंगातल्या अंधाऱ्या खोल्यांपासून, झोपडपट्टीत आणि वस्त्यांमध्ये उपाशीपोटी तडपत असलेल्या लाखो माणसांच्या समूहापासून ते त्या शोषित कामगारांपर्यंत – जे भांडवलशाही पिशाच्चाच्या रक्तशोषणाची क्रिया धाडसाने किंवा खरेतर, निरूत्साहाने पाहत आहेत – तसेच मानवी शक्तीचा विनाश पाहत आहेत, जे पाहून साधे तारतम्य असलेल्या कोणाही माणसाच्या अंगावर भीतीने

काटा येईल; आणि जास्तीचे ऊत्पादन गरजू लोकांना वाटण्याऐवजी समुद्रात फेकून देण्याला चांगले समजणाऱ्यांपासून ते राजांच्या महालांपर्यंत – ज्यांचा पाया माणसांच्या हाडांवर उभा आहे ... सर्व त्याला पाहू दे आणि मग म्हणू दे की “सर्व काही ठीक आहे”. का आणि कशासाठी? हा माझा प्रश्न आहे. तुम्ही गप्प आहात? ठीक आहे, मग माझे म्हणणे मी पुढे नेतो.

आणि हिंदूंनो तुम्ही, तुम्ही म्हणता की जे लोक आज कष्ट सोसत आहेत, ते पूर्वजन्मीचे पापी आहेत. ठीक आहे. तुम्ही म्हणता की आजचे शोषक गेल्या जन्मात साधूपुरुष होते, म्हणून आत्ता ते सत्तेचा आनंद उपभोगत आहेत. मला हे मान्य करायला लागत आहे की आपले पूर्वज फार धूर्त होते. त्यांनी तर्क आणि अविश्वासाच्या सर्व प्रयत्नांना फोल ठरवण्याची ताकद असलेले तत्वज्ञान बनवले. पण ह्या गोष्टी कुठपर्यंत टीकाव धरतात याचे विश्लेषण करण्याची गरज आहे.

न्यायव्यवस्थेच्या अत्यंत मान्यवर व प्रसिद्ध कायदेपंडितांच्या मते, गुन्हेगारावर होणाऱ्या परिणामाच्या आधारावर शिक्षा फक्त तीन किंवा चार कारणांनी उचित ठरवली जाऊ शकते. ती अशी – प्रतिकार, भीती आणि सुधारणा. आज सर्व पुरोगामी विचारवंतांनी बदला घेण्याच्या सिद्धांताची निंदा केली आहे. भीतीच्या सिद्धांताचा शेवटही तोच आहे. फक्त सुधारण्याचा सिद्धांतच आवश्यक आहे आणि तोच मानवाच्या प्रगतीचा अविभाज्य भाग आहे. अपराध्याला अत्यंत योग्य आणि शांतताप्रिय नागरिक म्हणून समाजामध्ये परत येता यावे हा याचा उद्देश आहे. पण घटकाभर आपण मान्य केले की काही माणसांनी (पूर्वजन्मी) पाप केले आहे तर अशांना देव कोणत्या प्रकारची शिक्षा देतो? तुम्ही म्हणता की तो त्यांना गाय, मांजर, झाडंझुडपं, पशू, वगैरे जन्म देऊन जगात पाठवतो. तुमच्या मते या दंडांची संख्या ८४ लक्ष आहे. मी तुम्हाला असे विचारतो की याचा माणसाची सुधारणा होण्याच्या दृष्टीने काय परिणाम होतो? पाप केल्यामुळे मी गेल्याजन्मी गाढव होतो असे सांगणारी किती माणसे तुम्हाला भेटली आहेत. एकही नाही? आपल्या पुराणांमधले दाखले देऊ नका. माझ्यापाशी आत्ता तुमच्या पुराणकथांना काहीही स्थान नाही. आणि तुम्हाला हे ठाऊक आहे का की गरीब असणे हे जगातील सगळ्यात मोठे पाप आहे? गरिबी हा एक अभिशाप आहे, एक दंड आहे. मला असे विचारायचे आहे की माणूस आणखी जास्त गुन्हे करायला प्रवृत्त होईल अशा शिक्षा सुचवणाऱ्या कायदेतज्ञाची तुम्ही प्रशंसा कराल काय? तुमच्या ईश्वराने हा विचार केला नव्हता का? त्यालाही ह्या सगळ्या गोष्टी मानवजातीला भोगाव्या लागणाऱ्या अपरंपार कष्टांच्या मोबदल्यात अनुभवातूनच शिकायच्या होत्या का? एखाद्या चांभार किंवा भंग्यासारख्या गरीब आणि अशिक्षित कुटुंबात जन्म घेणाऱ्या माणसाच्या नशिबी काय वाढून ठेवलेले असते असे तुम्हाला वाटते? तो गरीब आहे त्यामुळे तो शिकू शकत नाही. उच्च जातीत जन्माला आल्यामुळे स्वत:ला श्रेष्ठ



समजणाऱ्या त्याच्या सहकाऱ्यांकडून त्याचा तिरस्कार केला जातो. त्याचे अज्ञान आणि त्याची गरिबी, तसेच त्याला मिळणारी अपमानास्पद वागणूक यामुळे त्याच्या मनात समाजाबद्दल निष्ठुरता निर्माण होते. समजा त्याने एखादे पाप केले तर त्याचे परिणाम कुणाला भोगावे लागतील? देवाला, त्याला स्वत:ला का समाजातल्या बुद्धीवंतांना? मगरूर आणि अहंकारी ब्राह्मणांनी ज्यांना जाणीवपूर्वक अज्ञानी ठेवले, तुमच्या वेद-पुराणातील वाक्य चुकून कानी पडल्यामुळे ज्यांना कानात गरम शिसे ओतण्याची शिक्षा मिळत असे, अशा माणसांना मिळणाऱ्या शिक्षेचे काय? त्यांनी जर एखादा गुन्हा वा अपराध केला तर त्याला जबाबदार कोण आणि त्याचा वार कोण सहन करणार? माझ्या प्रिय मित्रांनो, हे सर्व सिद्धांत मूठभर प्रस्थापितांचे युक्तिवाद आहेत. ह्याच तत्वज्ञानाच्या आधारे ते त्यांनी बळकावलेली सत्ता, संपत्ती आणि श्रेष्ठत्वाचे समर्थन करतात. होय, बहुदा अप्टन सिंक्लेअरने कुठेतरी असे लिहिले आहे की माणसाला फक्त आत्म्याच्या अमरत्वावर विश्वास ठेवायला लावा आणि मग त्यानंतर त्याची सर्व संपत्ती व मालमत्ता खुशाल लुबाडा! अजिबात कुरकुर न करता तो त्यामध्ये तुम्हाला मदत करेल. धर्मोपदेशक आणि सत्ताधारी यांच्या युतीमुळेच तुरुंग, वधस्तंभ, दंडुका आणि हे तत्वज्ञान जन्माला आले आहे.

मला पुढे असेही विचारायचे आहे की जेव्हा माणूस पाप किंवा गुन्हा करत असतो तेव्हाच त्याला तुमचा तो सर्वशक्तिमान परमेश्वर त्यापासून परावृत्त का करत नाही? हे तर तो अगदी सहज करू शकतो. त्याने युद्ध करणाऱ्या राजांना का ठार मारले नाही किंवा त्यांच्यातील युद्धाची उर्मी गाडून का टाकली नाही, आणि याप्रकारे विश्वयुद्धामुळे मानवतेवर पडलेल्या संकटापासून त्याने का नाही वाचवले? भारताला स्वतंत्र करण्याची भावना त्याने इंग्रजांच्या मनात का नाही निर्माण केली? उत्पादनाच्या साधनांवर असलेला आपला व्यक्तिगत मालकीहक्क सोडावा अशी भांडवलदारांच्या मनात परोपकाराची भावना तो का उत्पन्न करत नाही आणि अशा प्रकारे सर्व श्रमिकांचीच नव्हे तर संपूर्ण मानवी समाजाची भांडवलशाहीच्या खोडातून मुक्तता तो का करत नाही? समाजवादी तत्वज्ञानाच्या व्यवहार्यतेविषयी तुम्हाला वाद घालायचा आहे ना, मी तो प्रत्यक्षात उतरवण्याचे काम तुमच्या परमेश्वरावरच सोपवतो. सर्वसामान्यांच्या हिताचा प्रश्न असेल तर लोक समाजवादाच्या तत्वज्ञानाला मानतात, पण तो व्यावहारिक नसल्याच्या सबबीखाली विरोध करतात. चला तर, तुमच्या परमेश्वरालाच येऊन सर्व गोष्टी योग्य प्रकारे करू दे. आता आडवळणाने त्याचा युक्तिवाद करू नका, त्याचा काही उपयोग नाही. मला तुम्हाला हे सांगायचे आहे की ईश्वराची इच्छा आहे म्हणून इंग्रज आपल्यावर राज्य करत आहेत असे नव्हे, तर त्यांच्याकडे ताकद आहे आणि आपण त्याला विरोध करण्याचे धैर्य दाखवत नाही म्हणून आहे. देवाच्या सहाय्याने त्यांनी आपल्याला गुलामीत ठेवलेले नाही, तर बंदूका,

रायफली, काडतुसे, बॉम्ब, पोलीस आणि सैन्याच्या आधारे ठेवले आहे. समाजाच्या विरोधातील सगळ्यात निंद्यनीय अपराध – एका देशाने दुसऱ्या देशाचे अत्याचार करून शोषण करणे – ते यशस्वीपणे करत आहेत. याला कारण आपली उदासिनता आहे. कुठे आहे परमेश्वर? आणि काय करतोय तो? मनुष्यमात्रांच्या या यातनांचा तो आनंद लुटतोय का? तो नीरो आहे, तो चंगेज आहे तर त्याचा सर्वनाश होवो.

या विश्वाच्या उत्पत्तीची आणि या मानवाच्या उत्पत्तीची व्याख्या मी कशी करतो हे तुम्हाला विचारायचे आहे का? ठीक आहे, मी सांगतो. चार्ल्स डार्विनने या विषयावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. ते वाचा. सोहन स्वामींचे 'कॉमन सेन्स' हे पुस्तक वाचा. काही प्रमाणात तुमच्या प्रश्नाचे उत्तर तुम्हाला मिळेल. विश्वाची उत्पत्ती एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. तेजोमेघाच्या आकाराच्या विविध पदार्थांच्या आकस्मिक मिश्रणातून पृथ्वीची निर्मिती झाली. कधी? इतिहासात बघा. अशाच प्रकारच्या घटनेमुळे जीवजंतू जन्माला आले आणि बऱ्याच कालावधीनंतर माणूस. 'जीवाची उत्पत्ती' हा डार्विनचा ग्रंथ वाचा. त्यानंतरची सर्व प्रगती ही माणसाने सतत निसर्गाशी केलेल्या संघर्षातून आणि त्याच्यावर विजय मिळवण्याच्या प्रयत्नातून झाली आहे. ही या घटनेची कदाचित सर्वात संक्षिप्त व्याख्या आहे.

तुमचा दुसरा युक्तिवाद हा असू शकतो की एखादे मूल जन्मतःच आंधळे नाही तर पांगळे निपजते ते पूर्वजन्मी केलेल्या पापामुळे नाही तर मग कशामुळे? जीवशास्त्रज्ञांनी ह्याचे वैज्ञानिक स्पष्टीकरण दिले आहे. सर्व दोष आईवडिलांचा आहे – जे आपल्या त्या कामाबाबत बेजबाबदार किंवा अडाणी आहेत, जे अपत्याला जन्मापूर्वीच विकलांग बनवतात.

निव्वळ बालीश असला तरी साहजिकच तुम्ही मला आणखी एक प्रश्न विचाराल – आणि तो प्रश्न हा आहे की जर देव अस्तित्वातच नाही तर मग लोक त्यावर विश्वास कसे ठेवायला लागले? यावर माझे थोडक्यात पण स्पष्ट उत्तर आहे – जसा ते भूतपिशाच्च्यावर व दुष्ट आत्म्यांवर विश्वास ठेवायला लागले तसाच ईश्वरावरही विश्वास ठेवायला लागले. फरक इतकाच आहे की देवावरचा विश्वास जगत्व्यापी आहे आणि त्याचे तत्वज्ञानही विकसित आहे. शोषणकर्ते परमेश्वराच्या अस्तित्वाची शिकवण देऊन लोकांना आपल्या ताब्यात ठेवण्याचा प्रयत्न करतात तसेच स्वतःच्या विशेष स्थानाला मान्यता प्राप्त करून घेतात. काही उग्रपरिवर्तनवादी (रॅडिकल) ह्याच्या उत्पत्तीचे श्रेय त्या शोषणकर्त्यांच्या प्रतिभेला देतात, पण मला ते मान्य नाही. सर्व धर्म, संप्रदाय, पंथ आणि अशा अन्य संस्था, शेवटी पिळवणूक करणाऱ्या संस्थाच्या, व्यक्तींच्या आणि वर्गाच्या समर्थक असतात ह्या मूलभूत गोष्टीबाबत त्यांच्याशी माझा विरोध नाही. राजाविरूद्ध बंड करणे प्रत्येक धर्मात नेहमीच पाप समजले जाते.



ईश्वराच्या उगमाबद्दल माझा विचार हा आहे की माणसाला आपल्या मर्यादा, दुबळेपणा आणि त्रुटी समजल्यानंतर सर्व प्रकारच्या संकटांना खंबीरपणे सामोरे जाण्यासाठी, स्वतःला प्रोत्साहित करण्यासाठी, सर्व संकटांना धैर्याने तोंड देण्यासाठी, तसेच समृद्धीच्या आणि भरभराटीच्या काळात स्वतःला आवर घालण्यासाठी माणसाने देवाचे काल्पनिक अस्तित्व निर्माण केले. स्वतःचे व्यक्तिगत नियम आणि पालकांची उदारता असलेल्या अशा देवाची संकल्पना जास्त मोठी करून रंगवली गेली. माणूस समाजाला घातक ठरू नये म्हणून त्याला भीती घालण्यासाठी किंवा प्रतिबंध करण्यासाठी देवाचा कोप किंवा व्यक्तिगत नियमांची कल्पना केली गेली. जेव्हा त्याच्या पालकत्वाच्या गुणांची व्याख्या केली जाते, तेव्हा 'त्याचा' उपयोग माता-पिता, बंधू, भगिनी, सखा आणि मदतनीस अशा रूपात होतो. जेव्हा सर्व मित्र विश्वासघात करतात किंवा दूर लोटतात, तेव्हा त्याला आधार द्यायला एक खरा मित्र, जो सर्वश्रेष्ठ आहे व काहीही करू शकतो ह्या कल्पनेने धीर मिळतो. आदिमानवाच्या काळात ही गोष्ट समाजासाठी उपयोगी होती. संकटाच्या काळात ईश्वराच्या संकल्पनेने माणसाला मदत होते.

मूर्तिपूजा, धर्मातील कोत्या समजूती ह्या विरूद्ध जसे लढायला लागले, तसेच ईश्वराच्या श्रद्धेविरूद्धही लढायला लागेल. अशाप्रकारे माणूस जेव्हा स्वतःच्या पायावर उभे राहण्याचा प्रयत्न करू पाहतो आणि वास्तववादी बनू लागतो, तेव्हा देवावरच्या श्रद्धा त्याला एका बाजूला फेकून द्यायला पाहिजेत. सर्व कष्ट व संकटे यांचा समर्थपणे सामना करण्याचा पुरुषार्थ दाखवायला हवा. माझी अवस्था आज नेमकी अशीच आहे. हा माझा अहंकार नाही. मित्रांनो! माझ्या विचार करण्याच्या पद्धतीमुळेच मी नास्तिक बनलो आहे. ईश्वरावर विश्वास आणि रोजची देवपूजा व प्रार्थना – जिला मी माणसाचे सर्वात स्वार्थी आणि खालच्या दर्जाचे काम मानतो – ह्यामुळे मला मदत होईल, का माझी परिस्थिती आणखी बिकट होईल मला माहित नाही. सर्व प्रकारच्या संकटांना धैर्याने तोंड देणाऱ्या नास्तिकांबद्दल मी वाचले आहे, म्हणूनच, अगदी वधस्तंभापर्यंतच्या अंतिम घटकेपर्यंत मी ताठ मानेने उभा राहू इच्छितो.

मी या विचारांवर किती प्रामाणिक राहतो ते पाहायचे आहे. माझ्या एका मित्राने मला प्रार्थना करायला सांगितली. मी जेव्हा त्याला माझ्या नास्तिक असण्याबद्दल सांगितले तेव्हा तो म्हणाला, "तुझ्या अखेरच्या दिवसात तू देवावर विश्वास ठेवू लागशील बघ." मी म्हणालो, "नाही माझ्या मित्रा, असे होणार नाही. असे करणे ही माझ्यासाठी अपमानास्पद बाब आहे आणि ती माझी हार असेल. स्वार्थी हेतूसाठी मी प्रार्थना करणार नाही." वाचक आणि मित्रहो, ह्याला तुम्ही अहंकार म्हणाल काय? जर तो असेल तर मी त्याचा स्वीकार करतो.